आर.जी.एन.एम. अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत...

सुखदेव महिपत मोरे-पाटील प्रतिष्ठान संचलित गणपतराव आडके इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग, नाशिक

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्र.एनयुआर-२०१२/प्र.क्र.१९६/१२/शिक्षण-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक: ४ जून, २०१२

वाचा:- १) संस्थेचे दि.१५.३.२०१२ चे पत्र
२) महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई यांचे पत्र क्र.एमएनसी/जी/महिपत/६४०/२००२, द.२१.६.२००२
३) महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई यांचे पत्र क्र.एमएनसी/जी/७२/आरजीएनएम /११८०/२००७, दि.८.६.२००७
४) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांचे प्रमाणपत्र क्र.१८-१९ /२६६९-आयएनसी, दिनांक १.६.२००६
५) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांचे फाईल क्र.०२/जुलै/२०११, दि.२०.७. २०११

प्रस्तावना:- महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई यांनी **सुखदेव महिपत मोरे-पाटील प्रतिष्ठान संचलित गणपतराव आडके इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग, नाशिक** येथे महाराष्ट्र परिचर्या परिषदेने संदर्भ क्र.३ अन्वये सन २००७-०८ या शैक्षणक वर्षासाठी २० ते ३० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह जीएनएम अभ्यासक्रमासाठी परवानगी दिली आहे. तसेच भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र. (४) अन्वये संस्थेस सन २००६-७ साठी २० विद्यार्थी प्रवेशासाठी परवानगी दिलेली आहे. तसेच त्यानंतर संदर्भ क्र.(५) अन्वये सन २०११-१२ साठी ३० (तीस) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी जीएनएम अभ्यासक्रमास परवानगी दिलेली आहे. भारतीय परिचर्या परिषदेने दिलेल्या परवानगीच्या अनुषंगाने सदर संस्थेस आर.जी.एन.एम.नर्सिंग अभ्यासक्रमासाठी शासन निर्णयाद्वारे अंतिम मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

भारतीय परिचर्या परिषदेने संदर्भ क्र.५ अन्वये सन २०११-१२ पासून दिलेल्या योग्यता/परवानगी प्रमाणपत्रानुसार खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून **सुखदेव महिपत मोरे-पाटील प्रतिष्ठान** संचलित **गणपतराव आडके इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग, नाशिक** येथे सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून ३० (तीस) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह जीएनएम नर्सिंग अभ्यासक्रम सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र परिचर्या परिषद, राज्य शासन यांनी जीएनएम नर्सिंग या अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.
२) महाराष्ट्र इन्स्टिटयुट प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी ॲक्ट, १९९७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने कोटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.
३) संस्थेने त्यांच्या संस्थेत शासकीय वैद्यकीय/परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांस सेवानिवृत्ती अथवा स्वेच्छानिवृत्ती असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही याबाबतचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवरील नोटराइज्ड प्रतिज्ञापत्र शासनास सादर करणे आवश्यक राहील.

४) भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र परिचर्या परिषदेने जीएनएम नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या मानकांची योग्यरित्या पूर्तता करुन संस्थेने दरवर्षी दोन्ही परिचर्या परिषदांची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

५) संस्थेस आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या कोणत्याही खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी शासनाकडे करता येणार नाही.

६) संस्थेने भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांची परवानगी मिळाल्यानंतर महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुलुंड, मुंबई यांचेकडून विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी घ्यावी.

७) उक्त परिषदांनी संस्थेस परवानगी नाकारल्यास प्रस्तुत शासन निर्णय आपोआपच रद्द होईल.

८) सदर जीएनएम नर्सिंग अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ३० (तीस) एवढी राहील. त्यापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नये.

९) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या दर वर्षी महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुलुंड, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे आवश्यक आहे.

१०) तसेच जीएनएम नर्सिंग अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या फी शुल्काची निश्चिती कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पू.) मुंबई करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अ.मो.आत्राम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रतः-

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,
कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पू) मुंबई-५१
सचिव, भारतीय परिचर्या परिषद, कोटला रोड, नवी दिल्ली- ११०००२.
प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुलुंड, मुंबई
सचिव, शिक्षण शुल्क व प्रवेश नियंत्रण समिती, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१
अध्यक्ष/सचिव, **सुखदेव महिपत मोरे-पाटील प्रतिष्ठान** संचलित **गणपतराव आडके इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग, नाशिक** मा.मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव
निवडनस्ती (शिक्षण-१)

Fax No. 23236140

Phone Nos. 23235570
23235619

INDIAN NURSING COUNCIL
COMBINED COUNCILS BUILDING
KOTLA ROAD, TEMPLE LANE
NEW DELHI - 110 002

Certificate No. 18-19/6238-INC **Date:-** 12 JAN 2013

Resolution No. 182/02/MAR/2012

In pursuance of the provisions of sub-section (2) of section 13 of the Indian Nursing Council Act 1947. Indian Nursing Council declares that the course conducted by the Institution mentioned below, is an approved course of study for admission to an approved examination for the said course. The number of students to be admitted is as specified below-

Name of Institution	Name of Course	Number of seats
GANPATRAO ADKE INSTITUTE OF NURSING, SUNFLOWER COMPOUND, DWARKA CIRCLE, NASHIK - 422001, MAHARASHTRA	ANM	20 (TWENTY)

This is valid for **2012-2013** academic year and till next inspection

Surekha Sama
(Surekha Sama)
SECRETARY
Indian Nursing Council
New Delhi-110002

(T. Dileep Kumar)
PRESIDENT
Indian Nursing Council
New Delhi-110002

List of State Nursing Council Recognised Institutions offering ANM Programme Inspected Under Section 13 and 14 of INC Act .

13 Aug 2018

717	Renuka School Of Nursing 459, Kaikade Hospital, Bazar Road Hingana, Dist - Nagpur - 441110, Maharashtra , Maharashtra	**Suitable**	20 (Twenty)
718	Paithan Nursing School Babara Hospital Bus Stand Road, Paithan Tq - Paithan Aurangabad Dist. Aurangabad, Maharashtra	**Suitable**	20 (Twenty)
719	Janaki Mahiladhar Pratishthan 32, Sawarkar Soc, Sahakarnagar No - 2 Pune - 411009, Maharashtra , Maharashtra	**Suitable**	20 (Twenty)
720	Ganpatrao Adke Institute Of Nursing 'Renuka', Ganesh Nagar, Opp Balbharti Mumbai Nara Road, Nashik - 422009 , Maharashtra	**Suitable**	20 (Twenty)
721	Shree Bhairavanath Shikshan Sanstha Plot No. 700, Indira Nagar Korochi, Ichalkaranji, Tehsil - Hatkanangale Dist. Kolhapur, Maharashtra	**Suitable**	20 (Twenty)
722	Late Asarabai Darade School Of Rgnm Near Odhagaon Aurangabad Highway Eklahare Nashik.422105 Maharastra - 422105 Nashik , Maharashtra	**Suitable**	20 (Twenty)
723	Sahyadri Seva Sanstha's Institute Of Nursing Samrudhha Nagar, Opp:Amrut Garden Hotel, Near Jadhav Sankul, Trimbak Road, Satput, Nashik, Maharashtra, Pin-422213 Near Jadhav Sankul, Trimbak Road Satpur Dist. Nashik, Maharashtra	**Suitable**	20 (Twenty)
724	Maharashtra College Of Nursing Majage Nagar, Kava Road Kava, Tal & Dist - Latur, Maharashtra , Maharashtra	**Suitable**	20 (Twenty)
725	Matoshri School Of A N M Nursing Matoshri Education Society Babhutgaon Tal, Yeola Dist, Nasik , Maharashtra	**Suitable**	20 (Twenty)
726	A N M School Of Nursing Gangai Nagar, Ashti Teh - Ashti, Dist - Beed, Maharashtra , Maharashtra	**Suitable**	20 (Twenty)
727	Giriraj Nursing School Giriraj Hospital Campus, Baramati Dist-Pune, Maharashtra - 413102 , Maharashtra	**Suitable**	30 (Thirty)
728	Florence Nightingle Nursing School Parwatabai Pundlikrao Tale Education Society Mudholkar Peth Amravati Maharashtra Mudholkar Peth Amravati Dist. Amaravati, Maharashtra	**Suitable**	20 (Twenty)

GANPATRAO ADKE INST. OF NURSING
0181
14 AUG 2018
0238/P
FAX | EMAIL | NET
COPY